# भाऊंचे कृषी क्षेत्रातील द्रष्टेपण...

**वाकोदसारख्या छोट्याशा गावातून शेतीच्या माध्यमातून मातीतून सोने उगविणाऱ्या मोठ्याभाऊंनी मातीचेच सोने केले. डॉ. भवरलालजी जैन यांनी ठिबकच्या तंत्रज्ञानातून, कृषी क्षेत्रात विविध प्रयोग, संशोधन करीत असताना 'शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हसू' यावे हीच त्यांची आंतरिक इच्छा आणि तळमळ होती. शेतकऱ्यांना केंद्रबिंदू ठेवून कृषी क्षेत्राची कास धरत आदर्श कार्यसंस्कृतीच्या आगळ्यावेगळ्या श्रमसंस्कारासह जैन उद्योग समूहाचा विस्तार सातासमुद्रापार केला. मोठेभाऊंच्या कृषी क्षेत्रातील द्रष्टेपण सर्वांना मार्गदर्शक ठरण्यासारखेच. त्यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्त...**



डॉ. भवरलालजी जैन यांना शिक्षण पूर्ण केल्यानंतर सनदी अधिकारी होण्याची संधी होती. मात्र, आईने 'नोकरी करण्यापेक्षा तू असे काही निर्माण कर ज्यात, आपल्या परिवाराचे पोट भरेल, इतकेच नव्हे तर पशू, पक्ष्यांचेही पोट भरेल' या प्रेरणेतून भाऊंनी जैन उद्योग समूहाची मुहूर्तमेढ रोवली. सुरुवातीला रॉकेलचा व्यापार, पेट्रोलपंप, खते बी-बियाण्यांची एजन्सी, ट्रॅक्टर विक्री, पीव्हीसी पाइपची एजन्सी, पपईच्या चिकापासून पपेनची निर्मिती त्यानंतर पीव्हीसी पाइपची निर्मिती, ठिबक तुषार सिंचन साहित्याची निर्मिती, बायो एनर्जी, सौर कृषी पंप असा हा सगळा प्रवास विलक्षण आहे. मनुष्य, प्राणी, वनस्पती, हवा, निसर्ग या सर्वांना सांभाळून समाजाच्या प्रत्येक घटकांशी बांधिलकी जोपासत सर्वसमावेशक विकास साधण्याची किमया कर्मयोगी मोठ्याभाऊंनी केली.

भारतीय संस्कारातील मूल्यांना आधुनिकतेची जोड देत मोठ्याभाऊंनी जैन इरिगेशनमधील सहकाऱ्यांना कठोर परिश्रमाची शिकवण दिली. भाऊंनी दिलेला संस्कार जैन परिवार आणि सहकाऱ्यांनी जपला. भाऊंनी संस्कारित केलेल्या कार्यसंस्कृतीतून 'कल्पना कणापरी, ब्रह्मांडाचा भेद करी!' या ब्रीद्रवाक्यानुसार जैन इरिगेशन वैश्विक स्तरावर यशस्वी वाटचाल करीत आहे. कठोर परिश्रम, पारदर्शकता, सचोटी, संशोधन अन् गुणवत्तेच्या जोरावर जगाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाचे जीवनमान समृद्ध करणाऱ्या भूमिपुत्रांच्या हिताचा विचार करणारा जैन उद्योग समूह जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचला आहे. मोठ्याभाऊंनी दूरदृष्टीतून शेती, शेतीपूरक उद्योग, जैन हिल्सवरील पाणलोट क्षेत्र, गिरणा नदीवरील बंधाऱ्यासह उजाड टेकड्यांवर हिरवाई, वनराई फुलवली. मोठ्याभाऊंनी केवळ दगड, मातीच्या टेकड्याच हिरव्यागार केल्या नाहीत तर माणसांची मनेही हिरवी केली. 'हिरवाईने नटलेली माझी सृष्टी हेच माझे वैभव आहे!' असे म्हणणाऱ्या कर्मयोगी मोठ्याभाऊंचे नाते मातीच्या माध्यमांतून ब्रह्मांडाशी होते.

डॉ. भवरलालजी जैन हे अमेरिकेमध्ये कृषी प्रदर्शन पाहण्यासाठी गेले होते. याठिकाणी शेती सुधारणा व आधुनिक कृषितंत्राच्या प्रसाराचे कार्य करणारे डॉ. आप्पासाहेब पवार व माजी केंद्रीय कृषी राज्यमंत्री अण्णासाहेब शिंदे यांच्याशी भेट झाली. अण्णासाहेब शिंदे यांनी भाऊंबद्दल असे उद्‌गार काढले की, 'भवरलाजींसारखी १०० माणसे घडणार असतील तर या देशाचे भवितव्य नक्कीच उज्ज्वल आहे' हे उद्‌गार भाऊंनी कर्तबगारीने खरे व शेतकऱ्यांसंदर्भात सार्थ करून दाखविले. इस्त्राईल, अमेरिकेमधील तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधावर आणल्याने ५० लाखांच्या वर शेतकऱ्यांना त्याचा फायदा झाला. पाण्याचे महत्त्व भाऊंनी ओळखले. तसे सूर्यशक्तीचे महत्त्व ओळखले. भाऊंनी सौर ऊर्जेवर चालणारा कृषी पंप जैन इरिगेशनच्या शास्त्रज्ञ-तंत्रज्ञांकडून तयार करून घेतला. यामुळे दुर्गम भागातही अल्पभूधारक शेतकऱ्यांना आपल्या शेतात फळबागा फुलविता आल्या. सर्वसामान्य शेतकरी जर मोठा झाला तरच मी मोठा होईल, ही व्यापक भूमिका त्यांनी मनाशी पक्की बांधली होती. आयुष्यभर त्यांनी त्यासाठीच स्वतःला वाहून घेतले. आर्थिकदृष्ट्या शेतकरी मजबूत व्हावा यासाठी उत्पादित मालावर प्रक्रिया करून देशासह परदेशात निर्यात केली. यासाठी जागतिक दर्जाचे फळप्रक्रिया उद्योग उभारले. पांढऱ्या कांद्याच्या माध्यमातून करार शेतीचे पथदर्शी मॉडेल भाऊंनी मांडले. गुणवत्ता, विश्वास आणि पारदर्शकता या जीवनमूल्यांचा आदर्श पेरत करार शेतीच्या माध्यमातून हजारो शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

### संशोधनातून शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती

भवरलालजींकडे विलक्षण दूरदृष्टी होती. ऊतीसंवर्धनात बायोटेक्नॉलॉजीचे महत्त्व ओळखले. भारतातील सर्वांत मोठी लॅब भाऊंनी उभारली. जैन इरिगेशनने निर्माण केलेल्या टिश्युकल्चर केळीच्या ग्रॅण्ड नाईन या व्हरायटीने शेतकऱ्यांचे जीवनमान बदलून गेले. जळगाव जिल्हा भारतात क्रमांक एकचा केळी उत्पादक जिल्हा म्हणून अल्पावधीतच नावारूपास आला. यासह डाळिंब, स्ट्रॉबेरी, मोसंबी टिश्युकल्चर रोपांमुळे शेतकऱ्यांना आर्थिक उन्नतीचा मार्ग गवसला. ऊतीसंवर्धन व ठिबक सिंचन या दोन्ही तंत्रांच्या संयोगातून केळीस लागणाऱ्या एकूण पाण्यापैकी साडेतीन पटीने पाण्याची बचत आम्ही करू शकलो; त्याबरोबरच विजेचाही वापर २०० टक्क्यांनी कमी करू शकल्याचे समाधान त्यांनी एका कार्यक्रमात व्यक्त केले.

### शेतकऱ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी पुढाकार

शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञान, संशोधनाची माहिती व्हावी, यासाठी जैन हिल्स येथे जैन गुरुकुल प्रशिक्षण केंद्राची सुरुवात केली. प्रात्यक्षिकासाठी डेमोन्स्ट्रेशन व्यवस्था केली. शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत कृषी तंत्रज्ञान पोहोचवावे यासाठी तालुकास्तरावर कृषितज्ज्ञ नेमले. जगातील विविध कृषी विद्यापीठांशी करार केले. शेतकऱ्यांना शेतीविषयी मार्गदर्शक माहिती मिळावी यासाठी भूमिपुत्र आणि कृषिजल हे कृषी क्षेत्राला वाहिलेले मासिके त्यांच्याच प्रेरणेतून सुरू केले.

### जलरक्षणात लक्षणीय योगदान

शेतकरी ग्रामीण भागात राहतात. भाऊंचीही जन्मभूमी वाकोद. येथे जलसंधारण आणि जलरक्षण हे भाऊंचे स्वतःचे काम होय. कांताई बंधाऱ्याची निर्मिती म्हणजे कृषी आणि जल क्षेत्रातील सर्वोच्च योगदान म्हणावे लागेल. या माध्यमातून आजूबाजूच्या खेड्यांचा विकास झाला. महाराष्ट्रातील जलव्यवस्थापनाचा मोठा प्रकल्प म्हणून कांताई बंधाऱ्याकडे बघितले जाते. महात्मा गांधीजींच्या विचारांप्रमाणे ग्रामीण भागातील समस्या दूर करण्याचे ते महत्त्वपूर्ण पाऊलही आहे. कृषी क्षेत्राला पूरक पोषक ठरणाऱ्या पक्षी प्राण्यांचे कीटक मुंगी मधमाशांचे संरक्षण आणि संवर्धन ही आपली नैतिक जबाबदारी मानून ती स्वीकारली. पक्षी, प्राण्यांबाबत भाऊ म्हणायचे आपण त्यांच्या अधिवासात आहे ते आपल्या नाहीत. त्यामुळे त्यांचे पालनपोषणाची जबाबदारी प्रत्येकाची आहे. त्यांच्यापासून होणारे नुकसानही आपण सहन केले पाहिजे. यातून भाऊंचे पशू, पक्ष्यांबाबतची जवळीक नाते समजते.

भाऊंच्या शेतीतील योगदानाची सकारात्मकपणे घेतलेली दखल म्हणजे त्यांना लाभलेले अनेक पुरस्कार. सिंचन तंत्राचा वापर व त्याचा प्रसार यासाठी असणारा अत्यंत गौरवास्पद अशा क्रॉफर्ड रीड पुरस्काराने भाऊंना सन्मानित करण्यात आले. भारत सरकारने 'पद्मश्री' पुरस्काराद्वारे त्यांच्या कार्याची दखल घेतली. यशवंतराव प्रतिष्ठानचा पुरस्कार मिळाल्यावर भाऊंनी सांगितले की, 'शेतकऱ्यांसाठी चांगले काम करणाऱ्या या प्रतिष्ठानने मला दिलेल्या पुरस्काराच्या रकमेत उजव्या बाजूचे एक शून्य वाढवून ही रक्कम आदरपूर्वक देत आहे' आणि भाऊंनी दहा लाखांची रक्कम दिली. यावरून शेती, शेतकऱ्यांप्रती भाऊंचे असलेले प्रेम, जिव्हाळा, आपुलकी दिसते. विद्येला विनयाची, साधनेला सातत्याची, विचाराला आचाराची, श्रद्धेला बुद्धीची, सुखाला शांतीची, संकल्पाला सिद्धीची, सौंदर्याला शालिनेची आणि प्रतिष्ठेला सेवेची साथ-संगत लाभते तेव्हाच पद्मश्री डॉ. भवरलालजी जैन यांच्यासारखे कृतज्ञ भूमिपुत्र घडतात. त्यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणास्त्रोत आहे.

- देवेंद्र पंढरीनाथ पाटील
मीडिया विभाग,
जैन इरिगेशन सिस्टीम्स, जळगाव